ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 11 | JULY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वतंत्र मजुर पक्ष आणि भारतीय राजकारण : एक अध्ययन

प्रा. डॉ. विनोद राठोड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख , श्री. प. दि. जैन. कला महाविद्यालय अनसिंग ता. जि. वाशिम.

प्रस्तावना

ब्रिटीश शासनकाळात प्रांतीय तथा केंद्रीय विधिमंडळात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे. त्याला तुल्यबळ असा पक्ष अथवा विरोधी पक्षाची भूमिका साकारणारा राजकीय पक्ष अस्तीत्वात येऊ शकला नाही. परंतु काँग्रेस पक्ष जमीनदार, भांडवलदार, कारखानदार, पुरोहित यासारख्या उच्चवर्गाच्या हितसंबंधाची जोपासना करतो असे डॉ. आंबेडकराचे मत बनले होते. त्यासाठी त्यांनी भारतीय प्रशासन कायद्यानुसार 1937 मध्ये होणाऱ्या निवडणूकीमध्ये शेतकरी, कष्टकरी, श्रमीक वर्गाच्या हितसंबंधाची जोपसना करण्यासाठी, त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांचा विधिमंडळातील सहभाग तथा प्रतिनिधित्व महत्वाचे आहे. यासर्व गोष्टी प्रत्यक्ष व्यवहारात लागु करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजुर पक्ष' 'Independence Labour Party' यापक्षाची स्थापना केली. त्याकरिता तत्कालीन इंग्लंडमधील राजकारण प्रभावित करणाऱ्या मजुर पक्षाच्या प्रभावाचे संशोधन करून त्यांनी समकक्ष ठरेल असा पक्ष स्थापन केला. या पक्षामध्ये शोषित, पिडीत, कामगार, शेतकरी, शेतमजूर तथा अस्पृश्य, दलित यांसारख्या वर्गांना सहभागी करून घेतले. त्यांनी या बहुजन समाजाच्या सर्वांगीण हिताचा जाहिरनामा तयार करून त्याप्रमाणे कार्य, चळवळी तथा आंदोलनाच्या माध्यमातून मजुर पक्षाची नियोजनबध्द राजकिय वाटचाल केली. 1937 च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये या पक्षाने प्रथमच लढविलेल्या 17 जागांपैकी 13 जागांवर उमेदवार निवडून आले. मुंबई प्रांतात या पक्षाला विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे अल्पावधित उदयास आलेला मजुर पक्षामुळे तत्कालीन भारतीय राजकारण प्रभावित झाले होते.

1924 चे 1937 पर्यंत डॉ. आंबेडकरांनी दलित, अस्पृश्यांच्या सर्वांगीण हितसंबंधाच्या रक्षणासाठी चळवळ, आंदोलने उभारली. त्यांनी 1937 च्या कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून दलित, अस्पृश्यांमध्ये राजकीय जाणीवा निर्माण करून त्याचे स्वतंत्र राजकीय अस्तीत्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.[1] इंग्लंडमधील गोलमेज परिषदेत आपला अभ्यासपूर्ण अभिप्रायाद्वारे लढा उभारून अस्पृश्याचे राजकीय अस्तित्व, त्याचे अधिकार मिळवून दिले. त्यांनी सुरूवातीच्या काळात चालविलेला अस्पृश्य समाजाच्या न्यायहक्कांबंधीचा लढा मर्यादित स्वरूपाचा होता. त्याला देशपातळीवरील स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी अस्पृश्याचा लढा, कामगार, शेतकरी, शेतमजुर या वर्गाच्या चळवळीशी जोडला. त्याकरिता त्यांनी राष्ट्रीय स्तरावरिल स्वतंत्र राजकीय पक्षाची स्थापना करण्याचे ठरविले. याचकाळात त्यांना इंग्लंडला वेळोवेळी गोलमेज परिषदेच्या निमित्ताने जावे लागले. तेथे त्यांनी मजुर पक्षाचे पदाधिकारी, पुढारी आणि कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधला. त्याचप्रमाणे मजुर पक्षाची घटना, विचारधारा, कार्यक्रम, ध्येय व उदीष्टये यासंबंधीचे संशोधन केले. या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वतंत्र मजुर पक्षाची प्रस्थापना केली.[2]

संशोधनाची उद्दिष्टे

1) डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेला स्वतंत्र मजुर पक्षाचा जाहिरनामा, कार्यक्रम, उदीष्टये यांचे अध्ययन करणे.
2) मजरु पक्षाचे तत्कालीन भारतीय राजकारणाच्या प्रभावाचे अध्ययन करणे.
3) मजुर पक्षाच्या ध्येयधोरणाची वर्तमान काळातील प्रासंगिकता तपासणे.

डॉ. आंबेडकराचा स्वतंत्र मजुर पक्ष नावाप्रमाणे केवळ कामगार, शेतकरी, शेतमजुर, या वर्गाच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी स्थापन करण्यात आलेला नव्हता. तर हा पक्ष भारतातील 90 टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या असलेला बहूजन समाजाला त्यांचे न्यायहक्क मिळवून देण्यासाठी स्थापन करण्यात आला होता. त्यांनी मजुर पक्षाच्या विनंती पत्रकात नमुद केले होते की, "गरिब वर्गातील लोकांना संघटित रितीने चळवळ करता यावी यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष नावाचा पक्ष मी स्थापलेला आहे. केवळ अस्पृश्य जातींच्या हितासाठी हा पक्ष नसून सर्व जातींच्या शेतकरी, कामगार, शेतकरी कुळे, मध्यम वर्गातील नोकरी पेशाचे लोक आणि किरकोळ व्यापारी लोक यांच्या योग्य हिताचे रक्षण करून त्यांना विशेष हक्क व सवलती मिळवून देणे हे या पक्षाचा उद्देश आहे. या उद्देशाच्या पुर्ततेसाठी आवश्यक ते कायदे करवून घेण्याचा मी माझ्या पक्षातर्फे प्रयत्न करीन."[3]

स्वतंत्र मजुर पक्षाचे ध्येय व उद्देश

1) भांडवलदार, जमीनदार, बनीया, ब्राह्मण या उच्चवर्गाच्या शोषणकारी प्रवृत्तीच्या विरोधात लढा उभारणे.[4]
2) सार्वत्रीक निवडणूकीत दलित, अस्पृश्य, श्रमीक, शेतकरी, शेतमजुरांना विधीमंडळात प्रतिनिधित्व मिळवून देणे.
3) शेतकरी, शेतमजूर, अस्पृश्य, दलित या वर्गात राजकिय जाणीवजागृती घडवून आणणे आणि राज्यकारभारात त्यांचा सहभाग वाढविणे.
4) अस्पृश्य व अस्पृश्योत्तर समाजात स्पृश्य–अस्पृश्य, दलित–सवर्ण अशा भेदभावाची भावना नष्ट करून त्यांच्यात राजकीय बाबतीत सहकार्य, समन्वय घडवून आणणे.[5]

स्वतंत्र मजुर पक्षाचा जाहीरनामा

1) कृषी क्षेत्राचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी तथा शेती हा व्यवसाय लाभदायी होण्यासाठी शेतकरी सहकारी पतसंस्था, भूतारण बँका, व खरेदी–विक्री संघाची स्थापना केल्या जाईल.
2) शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी शेती उत्पादनात वाढ करण्याबरोबरच उद्योगधंद्याचा विकास घडवून आणणे. परिसरातील कच्च्या मालाला पक्क्या मालात रूपांतर करण्याच्या उद्देशाने नविन उद्योगधंदे हा पक्ष स्थापन करिल.
3) लोकांना धंदेशिक्षणातील कला, कौशल्ये, तंत्रविज्ञान, अवगत होईल. याविषयीची व्यापक कार्यक्रमे अंमलात आणला जाईल.
4) समाज हिताच्या दृष्टिने मुलभूत उद्योगधंद्याचे हक्क, नियंत्रण व व्यवस्थापन सरकारकडे राहील.
5) शोषणमुक्त अर्थव्यवस्था निर्माण केल्या जाईल.
6) जमिनदारी, जहागिरदारी यासारख्या पध्दतीत शेतकरी कुळावर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी आवश्यक कायदे संमत केल्या जाईल.
7)शेतकरी व कामगार वर्गांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला दिला जाईल जेणेकरून त्यांच्या राहणीमानात सुधारणा होईल यासाठी हा पक्ष प्रयत्न करील.
8) कारखान्यातील कामासंबंधी कामाचे तास, कामाचा मोबदला, पगारी रजा, बोनस, पेन्शन, वेतनवाढ, यासेवाशर्ती लागू करून त्यांना नोकरीची सुरक्षितता मिळवून दिल्या जातील.
9) बेरोजगारी निवारणासाठी नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.
10) अवाजवी व्याज घेणाऱ्या तसेच गरीब वर्गाचा अशिक्षितपणाचा फायदा घेणाऱ्या सावकारांपासून गरिब कर्जदाराचे संरक्षण करण्यासाठी आवश्यकते कायदे संमंत केल्या जातील.
11) मोठ्या शहरात व औद्योगिक वसाहतीत मध्यम वर्गांना योग्य दरात भाड्याने घर मिळते. कर वसूल करतांना गरिब वर्गावर अन्याय होणार नाही यासाठी आवश्यकती काळजी सरकार घेईल. यासाठी हा पक्ष प्रयत्न करील. उपरोक्त जाहीरनाम्यात आर्थिक सुधारणाबरोबरच सामाजिक सुधारणासुध्दा सुचविण्यात आलेले आहेत.

12) उच्च वर्गाकडून, सनातन्याकडून समाजसुधारक तथा दलित, अस्पृश्यांवरील विविध प्रकारच्या अन्यायाचे प्रतिबंध घालण्यासाठी संबंधीत अन्याय शिक्षापात्र गुन्हा ठरविणाऱ्या कायद्याची निर्मिती केल्या जातील.
13) धार्मिक द्रव्य निधिचा विनीयोग समाजसुधारणेसाठी आवश्यक असलेल्या शिक्षणासारख्या कामी सदुपयोग व्हावा यासाठी सार्वजनिक धर्मदाय संस्थावर राज्याचे नियंत्रण असणारा कायदा केल्या जातील. तसेच भिकारी व अन्य निराश्रीत लोकांच्या उदरनिर्वाहाची योग्य ती व्यवस्था केल्या जातील.
14) ग्रामीण भागातील नागरिकांना सुखी व समृध्द जिवन जगता यावे यांसाठी आवश्यक ते प्रयत्न केले जातील. शहराप्रमाणेच ग्रामीण भागातील घरबांधणे, वाचनालय, सार्वजनिक सभागृहे, फिरते सिनेमे, रेडिओ वगैरे सोईसुविधा उपलब्ध करून दिल्या जातील जेणेकरून जनतेच्या कल्पनाशक्ती, विचारशक्तीला चालना मिळेल. यासाठी प्रयत्न केल्या जातील.
15) मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अंमलात आणणे, प्रौढ साक्षरता मोहीम चालविणे, औद्योगिक शिक्षणावर विशेष भर देणे, मागास जातीतील हुशार विद्यार्थ्यांना देशात तसेच विदेशात उच्च शिक्षण देण्यासाठी आवश्यकती सरकारी सोईसुविधा मिळेल अशी उपाययोजना करणे विद्यार्थ्यांच्या बुध्दीमतेला चालना देणारी, आदर्श पिढी घडविणारी नविन शिक्षण पध्दतीचा स्विकार करणे यांसाठी हा पक्ष प्रयत्न करील.
16) राज्यकारभाराच्या सुशासनासाठी न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत करणे, राज्यकारभारात व प्रशासनात सर्व जाती, धर्मांना पुरेसे प्रतिनिधीत्व देणे यानुसार अधिक परिणामकारक पध्दतीने राज्यकारभार अंमलात आणणे यासाठी हा पक्ष प्रयत्न करिल.

या पक्षाच्या जाहीरनाम्याच्या संदर्भात मत व्यक्त करतांना एका इंग्रजी दैनिकाने म्हटले आहे की, 'जरी आमचे मत राजकीय पक्षांच्या संख्येत वाढ होऊ नये असे असले तरी डॉ. आंबेडकरांनी स्थापलेला नवा पक्ष हा लोकांचे जीवन समृध्द करण्याच्या दृष्टिने तथा देशाच्या भवितव्याला वळन लावण्याच्या कामी अत्यंत उपयोगी पडेल अशा पक्षाला वाव आहे. आणि आवश्यकताही आहे. समाजवाद्यांशी सहकार्य करून देशावर धो–धो करीत पसरणाऱ्या साम्यवादाच्या लाटेला थोपवून धरणारी ही एक संरक्षणाची भिंत ठरेल'[6] तसेच नामदेव ढसाळ यांनी आपल्या 'आंबेडकरी चळवळ आणि सोशॅलिस्ट कम्युनिष्ठ' या ग्रंथात स्वतंत्र मजुर पक्षाच्या जाहीरनाम्याबाबत म्हटले आहे की, 'इतका ध्येयपूर्ण, निसंदिग्ध व जनहितांबद्दल दक्षता बाळगणारा जाहिरनामा तत्कालीन राजकीय पक्षांत क्वचितच सापडेल'[7] वरिल दोन्हीही प्रतिक्रियांची समिक्षा केल्यास या पक्षाचा जाहीरनामा किती लोकाभीमुख होता. हे स्पष्ट होते.

या पक्षाच्या जाहीरनाम्यानूसार स्वतंत्र मजुर पक्षांनी 1937 मधील मुंबई प्रांतीय विधिमंडळाची पहिली निवडणूक लढविली. या निवडणुकीत उभ्या केलेल्या 17 उमेदवारांपैकी 13 सभासद निवडून आले या मजुर पक्षाने जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करण्यासाठी कधी विधिमंडळात तर कधी विधिमंडळाबाहेर धरणे, आंदोलने, मोर्चे या लोकशाहीच्या अहिंसक मार्गाने प्रयत्न केले.

स्वतंत्र मजुर पक्षाचे कार्य

1) स्वतंत्र मजुर पक्षाने शेतकरी हिताच्या विविध मागण्या मंजूर करून घेण्यासाठी 10 जानेवारी 1938 रोजी 20 हजार शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा विधिमंडळावर नेला होता. डॉ. आंबेडकरांनी या मोर्चाचे नेतृत्व करतांना शेतकऱ्यांसंबंधीच्या चार मुलभूत मागण्या सादर केल्या. 1) जमीन कसणाऱ्याला योग्य मोबदला मिळाला पाहिजे. 2) खोत पध्दतीमधील दलाल संपुष्टात आणणे. 3) शेतकऱ्यावर त्यांच्या उत्पन्नाच्या आधारवर कर आकारणे. जेणेकरून त्यांच्या उदरनिर्वाहामध्ये अडचण येणार नाही.[8]
2) महारांना गुलामगिरींचे जिवन जगण्यासंबंधी बाध्य ठरवणारी महारवतन पध्दत नष्ट करण्यासंबंधी तसेच शेतमजुराचे शोषण करणारी खोती पध्दती रद्द करण्यासंबंधी अशी दोन विधयके डॉ. आंबेडकरांनी मुंबई विधिमंडळात मांडली होती. शहरी अस्पृश्यांचे शोषण थांबविण्यासाठी सावकारी नियंत्रण विधेयकही विधिमंडळात प्रविष्ठ करण्याची अनुमती मागीतली होती.[9]
3) विशिष्ठ वयाच्या सर्व स्त्री–पुरूषांना समान मताधिकार मिळावा या न्याय मागणीच्या पुर्ततेसाठी या पक्षाच्यावतीने मोर्चे काढून सरकारला निवेदन सादर केले होते.[10]
4) तत्कालीन सरकारने श्रमीक कामगार वर्गाच्या संपाचे अधिकार हिरावून घेण्यासंबंधीचे विधेयक आणले होते. सदर विधेयकांवर डॉ. आंबेडकरांनी प्रखर विरोध, टिकाटिप्पणी करून संपाधिकार हिरावून घेणे

हे कामगारांवर गुलामगिरी लादणारे आहे. असे न्यायसंगत मत नोंदविले होतेकामगारांना त्यांच्या न्याय हक्कांसाठी सामुहीक संपाधिकार असावा असे आंबेडकरांचे मत होते.[11]

5) विडी कामगारांना न्यायहक्क मिळवून देण्यासाठी या पक्षाने महत्वाचे प्रयत्न केले.[12]

प्रासंगिकता

भारताची राज्यघटना अंमलात येऊन 68 वर्ष पुर्ण झाली. तरीसुध्दा आजही बहुसंख्य कष्टकरी समाज दारिद्री, अत्यंत हालाखिचे जिवन जगत आहे. डॉ. आंबेडकर यांच्या नंतरच्या कालखंडात भारतातील विविध राजकीय पक्षांमार्फत नियोजनबध्द पध्दतीने मजूर पक्षाची विल्हेवाट लावून त्यांची चळवळ, आंदोलने निष्प्रभ व दुर्बल केली आहे. मजुर पक्षाचे पदाधिकारी, पुढारी, कार्यकर्ते विविध राजकीय पक्षात तथा विविध संघटनेच्या रूपात विभागला गेला आहे. प्रसंगी मजुर वर्गाचे राजकारण प्रभावहिन ठरताना दिसत आहे. प्रादेशिक पक्ष वा राष्ट्रिय पक्षांमार्फत कामगार, श्रमीक वर्गाच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी जी चळवळ, आंदोलने चालविली जात आहे. त्यामध्ये ढोंगीपणा अधिक जाणवतो. केवळ मताच्या राजकारणासाठी कष्टकरी, श्रमीक, शेतकरी, शेतमजूर, अस्पृश्य या बहुसंख्य वर्गाचा सर्रास वापर केला जात आहे. जवळपास सर्वच राजकीय पक्षाचा जाहीरनामा कष्टकरी वर्गाच्या हितसंबंधावर आधारलेला असतांनाही तोच पक्ष सत्तेवर आल्यानंतर कष्टकरी वर्गांसाठी क्रांतीकारी स्वरूपाच्या योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यात असमर्थ ठरला आहे. तसेच कष्टकरी वर्गांसाठी अस्तित्वात असलेल्या कल्याणकारी कायद्याची पाहिजे त्या प्रामाणात अंमलबजावणी करण्यास सुध्दा सत्ताधारी पक्ष अपयशी ठरला आहे. भारतामध्ये राज्यघटनेनूसार समाजवादी राज्यव्यवस्था स्विकारण्यात आली असून सर्वच पक्ष सत्तेवर आल्यानंतर भांडवलदार, कारखानदार, यांच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी कार्य करतांना दिसत आहे. विविध कंपन्या, औद्योगिक वसाहती वा अन्य कामाच्या ठिकाणी मजुर, कामगारांना कामाचा अल्प मोबदला देणे, वेळेवर सुटटी न देणे, त्यांना कधीही कामावरून काढून टाकणे, भविष्य निर्वाह निधीची व्यवस्था न करणे, वेळेवर वेतन न देणे, सिंचनाच्या अपुऱ्या सोयी, शेतमालाला रास्त भाव न देणे, घरकामगारांचा शारिरीक व मानसिक छळ करणे, दलित, अस्पृश्यांवरिल अन्यायकारक घटना, स्त्रीयांवरिल अत्याच्यार, मॉबलिचींग या सर्व अन्यायकारक गोष्टी नित्याच्याच घडतांना आपण दररोज उघड्या डोळ्यांनी वर्तमानपत्रे व दूरसंचार माध्यमातून पाहत आहो. त्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या नावाचा वापर करणारे विविध पक्षातील पुढारी, कार्यकर्त्यांनी पुन्हा एकवार डॉ. आंबेडकरांच्या स्वप्नातील स्वतंत्र मजुर पक्षाची बांधणी करून बहुजन वर्गाच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकरांनी बहूजनांना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या निमित्ताने जे स्वप्न बघितले होते ते प्रत्यक्षात साकार करण्यासाठी मजूर पक्षाचे धोरण, कार्यक्रम, जाहीरनामा या आधारवर बहुजनवर्गाला संघटित करणे महत्वाचे आहे. त्यासाठी देशभर व्यापक प्रमाणात श्रमीक वर्गाची चळवळ, आंदोलने उभारणे आवश्यक आहे. संपूर्ण भारतातील कष्टकरी वर्गांना संघटित करून इंग्लंडमधील मजूर पक्षासारखे राजकीय अस्तित्व निर्माण करणे आवश्यक आहे. इंग्लंडप्रमाणे भारतात कष्टकरी वर्गाचे हक्काचे सरकार स्थापन करून तमाम बहुजन वर्गांना त्यांचे न्याय हक्क मिळवून दिल्याशिवाय डॉ. आंबेडकरांचे स्वप्न साकार होणार नाही. आजच्या जात, धर्म, या संकुचित विचारधारेवर देशविघातक राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षाचे राजकारण आटोक्यात आणण्यासाठी आज अस्तित्वात नसलेला डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाची विचारधारा, कार्यक्रम, धोरणे निश्चीतपणे क्रांतीकारक ठरणारे असल्याचे संशोधकाचे मत आहे. एकुणच बहूजन वर्गावरील अन्याय अत्याचाराच्या सोडवणूकीसाठी तथा उपाययोजनेसाठी डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाची विचारधारा धोरणे तथा कार्यक्रम आजही प्रासंगिक ठरणारे आहे असे निश्चितपणे म्हणता येईल.

निष्कर्ष

शोषण करणारा व शोषणाला बळी पडलेला वर्ग एकाच राजकीय पक्षात राहणे विसंगत आहे हे ओळखून डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. या पक्षाच्या माध्यमातून त्यांनी कामगार, शेतकरी, शेतमजूर, दलित, अस्पृश्य या बहूजन वर्गात राजकीय जाणीवजागृती निर्माण करून त्यांना राजकीय दृष्ट्या संघटित केले. मुंबई प्रांत विधिमंडळाची या पक्षाच्या वतीने लढविण्यात आलेल्या पहिल्याच निवडणुकीत या पक्षाला चांगले यश मिळवून दिले. या पक्षाच्या जाहीरनाम्यानुसार सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी अथक प्रयत्न केले. या पक्षाने तत्कालीन सरकारला कामगार, श्रमीक, दलित, अस्पृश्यांच्या हितासंबंधीचे विविध कायदे करण्यास भाग पाडले.

संदर्भ ग्रंथसूची

1) खैरमाडे, चा.भ, 'डॉ. भिमरावजी रामजी आंबेडकर' खंड 7 सुगावा प्रकाशन पुणे प. आ. 1985 पृ. 9
2) कित्ता पृ. 10
3) ॲडमिरल भागवत विष्णू, 'जागतिकीकरण नविन गुलामगिरी' समता प्रकाशन नागपुर प. आ. 2004 पृ. 7–8
4) कित्ता पृ. 8
5) फडके य. दी, 'आंबेडकरी चळवळ' श्री विद्याप्रकाशन पुणे 1990 पृ. 84
6) लिंबाळे शरणकुमार 'प्रज्ञासुर्य' दिलीपराज प्रकाशन पुणे दु. आ. 2007 पृ. 294
7) किर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पॉप्युलर प्रकाशन मुंबई च. आ. 2006 पृ. 317
8) ढसाळ नामदेव, 'आंबेडकरी चळवळ आणि सोशॅलिस्ट कम्युनिष्ट' पृ. 20
9) लिंबाळे शरणकुमार उपरोक्त पृ. 294
10) कित्ता पृ. 393
11) कित्ता पृ. 294
12) कित्ता पृ. 294